# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनाट क्रमांक २५५-२२** **दिनांक १७/०८/२०२**

## मिरा-भाईंदर मधील शाळा व महाविद्यालयातील विदयार्थ्यांना “कायदेविषयक शिक्षण” देण्याचा भरोसा सेलच्या माध्यमातून उपक्रम.

सध्या संपुर्ण भारतभर स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शासनाच्या निर्देशानुसार विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहे. मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीसांचे वतीने देखील विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये ७५ किलोमिटर आझादी की दौड, हर घर तिरंगा, ७५ पोलीसांचे हस्ते ७५ झाडांची वृक्ष लागवड, वाहतुक नियमांच्या जनजागृतीसाठी रॅली अशा विविध स्वरुपाचे कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्याचप्रमाणे भरोसा सेल, भाईंदर (प) शाखेच्या मार्फतीने मिरा-भाईंदर मधील सर्व शाळांमध्ये जनजागृती अभियान अंतर्गत शाळा व महाविद्यालयातील विदयार्थ्यांना महिला व बालकांविषयक कायदे, त्यांची सुरक्षितता, सायबर गुन्हे, अंमली पदार्थांचे दुष्परिणाम इ. बाबत कायदेशीर माहिती देण्याच्या अभियानाला दिनांक १२/०८/२०२२ रोजीपासून सुरुवात करण्यात आली आहे.

सदर जनजागृती अभियानाअंतर्गत मिरा-भाईंदर मधील आतापावेतो १) अवर लेडी ऑफ नाझरत हायस्कूल, २) निर्मला निकेतन हायस्कूल, ३) जे.एच. पोद्दार हायस्कूल, ४) सेंट झेवियर्स हायस्कूल, ५) मिरा-भाईंदर महानगरपालिका परिषद शाळा ६) अवर लेडी वेलेंकीनी हायस्कुल ७) डॉन बॉस्को स्कुल व ८) सेंट झेविअर्स हायस्कुल या ८ शाळा व महाविद्यालयांतील ३५०० विद्यार्थ्यांना महिला व बालकांविषयीच्या कायदयांबाबत, त्यांच्या सुरक्षिततेबाबत, सायबर गुन्हे, अंमली पदार्थांचे दुष्परिणाम याबाबत माहिती देवून कायदयाचे शिक्षण देण्याचा उपक्रम “भरोसा सेल”च्या माध्यमातून राबवण्यात आला आहे.

सदर अभियानाअंतर्गत स.पो.नि. तेजश्री शिंदे व भरोसा सेल समुपदेशन समितीमधील समुपदेशक श्रीमती आशा सॅलियन, प्रयास फाउंडेशनच्या संस्थापिका श्रीमती जेसी सिस्टर, माजी मुख्याध्यापिका होली क्रॉस कॉन्व्हेन्ट हायस्कूल, मिरारोड यांच्या मदतीने “कायदेविषयक शिक्षण” देण्याचे अभियान वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे.

----oooo----





